नगररचना विभाग
स.प./न.प./ज प /आ.क. ४२/२०१८-१९
दिनांक :- ०५।०६।१८

दा. ५
५३८
४।६।१८
नगर सचिव

(पहा नियम ३ नुसार)

माहितीसाठी करावयाचा अर्जाचा नमुना

माहितीचा अधिकार कायदा २००५ अन्वये अर्ज

प्रति,

**मा. जन माहिती अधिकारी ,**
आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
भाईंदर (पु.), ता.जि.ठाणे

10 रु. Rs.10 COURT FEE भारत INDIA - 2 JUN 2018 दस रुपये TEN RUPEES

१) अर्जदाराचे पूर्ण नांव : **सुनिल उत्तमराव भगत**

२) पत्ता : ४०१/ए, साई संकल्प अपार्ट., नवघर गावं, भाईंदर (पु.), ता.जि.ठाणे. मो. नं. ९८२१२६३३१७

३) आवश्यक असलेल्या माहितीचा : तपशिल — मा. महासभा दि.१२.०८.२०१६ रोजी प्रकरण क्र. ४४ च्या ठराव क्र. ४३ च्या प्रत मिळणे बाबत. मा. दिलीप जगदाळे तसेच दादासाहेब खेत्रे यांच्या ठरावातील प्रत मिळणेबाबत

एक) माहितीचा विषय : मा. महासभा दि.१२.०८.२०१६ रोजी प्रकरण क्र.४४ या विषयावर झालेल्या ठरावाची प्रत तसेच श्री. दादासाहेब खेत्रे यांना मिरा भाईंदर महापालिकेत हजर करुन घेतलेले आहे. त्याबाबत आदेशाची प्रत छायांकित मिळणे बाबत.

दोन) माहितीशी संबंधित कालावधी : सन २०१६-२०१७ कालावधीतील

तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन: वरील प्रमाणे

चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश :- आवश्यक आहे किंवा कसे :- व्यक्तीश:
(प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ठ केला जाईल)

पाच) टपालाद्वारे असेल त्या बाबतीत :- (सर्वसाधारण नोंदणीकृत किंवा शीर्घ) नाही

४) अर्जदार दरीद्रय रेषेखाली आहे किंवा असे :- नाही

ठिकाण :- भाईंदर

दिनांक २/६/२०१८

अर्जदाराची सही /-

Bhagat

सुनिल उत्तमराव भगत

०८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./४२/2017-18

दिनांक :-०७/०६/2018

प्रति,
**श्री. सुनिल उत्तमराव भगत**
**401/ए, साई संकल्प अपार्ट,**
**नवघर गाव, भाईंदर (पूर्व)**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**मा. महासभा दि. 12/08/2016 प्रकरण क्र. 44 या ठरावाची प्रत मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 02/06/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण मा. महासभा दि. 12/08/2016 प्रकरण क्र. 44, ठराव क्र. 43 या ठरावाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 12/08/2016 प्रकरण क्र. 44, ठराव क्र. 43 या ठरावाची सत्यप्रत या पत्रासोबत जोडून देत आहोत. (एकूण पाने 02)

तसेच श्री. दादासाहेब खेत्रे यांना मिरा भाईंदर महापालिकेत हजर करुन घेणे बाबतच्या ओदशाच्या प्रतीची आपण मागणी केलेली आहे. सदर बाब आस्थापना विभागाशी निगडीत असल्याने उक्त माहिती आपणांस उपलब्ध करुन देणेसाठी संदर्भित पत्राची छायांकित प्रत या कार्याकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./42/2018-19 दि. 07/06/2018 अन्वये, आस्थापना विभागात वर्ग करण्यांत आली आहे. सदरची माहिती जनमाहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांचेकडून घेण्यांत यावी.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

Recived. Bhagat, 8/6/18

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Sunil Bhagat.docx

016

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./४२/2017-18 दिनांक :- ०७/०६/2018

प्रति,
जनमाहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
श्री. दादासाहेब खेत्रे यांना मिरा भाईंदर महापालिकेत हजर करुन घेणे बाबतच्या ओदशाची प्रत मिळणेबाबत.

संदर्भ :- श्री. सुनिल उत्तमराव भगत यांचेकडील दि. 2/06/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

अर्जदार श्री. सुनिल उत्तमराव भगत यांनी श्री. दादासाहेब खेत्रे यांना मा. महासभा दि. 12/08/2016 प्रकरण क्र. 44, ठराव क्र. 43 अन्वये मिरा भाईंदर महापालिकेत हजर करुन घेणे बाबतच्या ओदशाची प्रतीची मागणी केलेली आहे. सदर बाब आपल्या विभागाशी निगडीत असल्याने, संदर्भित अर्जाची छायांकित प्रत आपणांकडे वर्ग करण्यांत येत आहे. तरी कृपया अर्जदारांस उक्त माहिती आपणांमार्फत मुदतीत परस्पर देण्यांत यावी.

कळावे.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

**प्रत माहितीस्तव :-**
श्री. सुनिल उत्तमराव भगत
401/ए, साई संकल्प अपार्ट,
नवघर गाव, भाईंदर (पूर्व)

Received by
7/6/18.

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Sunil Bhagat.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१२/०८/२०१६

प्रकरण क्र. ४४ श्री. दादासाहेब खेत्रे, (निलंबीत) विभागप्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग व श्री. दिलीप जगदाळे, (निलंबीत) प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.०६ निलंबन कायम करणेबाबत...

ठराव क्र. ४३

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर श्री. दादासाहेब खेत्रे, विभागप्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांना जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./निलंबन/१८६४/२०१६, दि. ०६/०२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये तसेच श्री. दिलीप जगदाळे, प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. ०६ यांना जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./निलंबन/१८६५/२०१६, दि. ०६/०२/२०१६ अन्वये शहरातील दैनंदिन होणारी अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करणे/नियंत्रण करणेची जबाबदारी विभागप्रमुख/प्रभाग अधिकारी यांची आहे. तथापी प्रभागाअंतर्गत नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करणे, बांधकामे निष्कसित करणे, अतिक्रमणे/अनधिकृत बांधकाम करणारे विकासक यांचेवर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन न्यायालयात दावा दाखल करणे याबाबी वेळच्यावेळी निदर्शनास आणून देखील, तसेच आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेले निर्देश यावर कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्यामुळे प्रभाग समिती अंतर्गत अनधिकृत बांधकामे उभी राहण्यास मदत झाल्याचे, तसेच सदरची अनधिकृत बांधकामे व्याप्त झाल्याचे दिसून येते. सदरच्या अनधिकृत बांधकामावर वेळच्यावेळी बांधकाम तोडण्याची कारवाई न अवलंबिता प्रत्येकवेळी वेगवेगळी भुमिका घेऊन अनधिकृत बांधकाम पूर्ण करण्यास सहकार्य केल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे विहित वेळेत सोपविलेली कामे न करणेकामी कसुर झाल्याने त्यांना निलंबीत करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात १९४९ चे कलम ५३ व ५६ अन्वये सहाय्यक आयुक्त (वर्ग-०२) या समकक्ष पदावरील अधिकाऱ्यांची नियुक्ती व काढून टाकण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या महासभेकडे निहित आहेत. त्याअनुषंगाने सक्षम प्राधिकारणाने नियुक्त केलेल्या असा कोणत्याही अधिकाऱ्यांस किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिकेचा आदेश होईपर्यंत निलंबीत करु शकेल, व अशाप्रकारे निलंबीत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्तांनी ताबडतोब महानगरपालिकेस कळविले पाहिजेत व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही, तर ते निलंबन संपुष्टात येईल अशाप्रकारची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात १९४९ चे कलम ५६ (१) (ब) मध्ये तरतुद आहे.

सबब श्री. दादासाहेब खेत्रे, (निलंबीत) विभागप्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग व श्री. दिलीप जगदाळे, (निलंबीत) प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. ०६ यांना दि. ०६/०२/२०१६ रोजी निलंबीत केलेले आहेत. तरी त्यांचे निलंबन कायम करुन सदर विषयाबाबत १ महिन्याच्या आत मा. आयुक्त यांनी चौकशी करुन आरोप सिध्द झाल्यास सदर व्यक्तींना बडतर्फ करण्यात यावे. सदर चौकशी अंती १ महिन्याच्या आत निर्णय देण्यात यावा व यात दिरंगाई केल्यास त्यांचे पुढील देय देण्याबाबतची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** Vasani 12/8/2016.
Dr. Nayana M. Vasani

**अनुमोदक :-**
श्री. प्रशांत केळुसकर

**ठराव सर्वानुमते मंजुर.**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**